# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.12.2024** **वारःगुरुवार**

---

1. सागरी व्यापार संरक्षित करून भारतीय नौदल देशाची आर्थिक व्यवस्था संरक्षित करत राहील-राष्ट्रपतींचा विश्वास
2. भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांचा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी शपथविधी.
3. फ्रान्समध्ये पंतप्रधान मिशेल बार्निए यांनी विश्वासमत गमावलं
4. पुरुषांच्या हॉकी कनिष्ठ आशिया करंडक स्पर्धेत भारत विजेता आणि
5. किनारपट्टी भागात वादळी पाऊस पडण्याचा हवामान खात्याचा अंदाज

**राष्ट्रपती-नौदल**

भारतीय नौदल नेहेमीच देशाच्या सागरी सीमांचं रक्षण करत राहणार असून, 2047 पर्यंत देशाला विकसित भारत बनवण्यासाठी आपलं सहकार्य आणि योगदान देत राहील असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. ओडिशातील पुरी येथील ब्लू फ्लॅग बीचवर नौदल दिनाच्या समारंभात त्या बोलत होत्या. सागरी व्यापार संरक्षित करून नौदल एकप्रकारे देशाची आर्थिक व्यवस्था संरक्षित करत राहील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. 1971 च्या भारत-पाक युद्धादरम्यान राबवण्यात आलेल्या ऑपरेशन ट्रायडंटच्या वर्धापन दिनानिमित्त नौदल दिन साजरा करण्यात येतो. काल पुरी इथे झालेल्या कार्यक्रमात नौदलाच्या 15 हून अधिक जहाजं, पाणबुड्या, 40 हून अधिक विमानं आणि सागरी कमांडोजनी साहसी प्रदर्शन केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज भुवनेश्वरमध्ये ओडिशा कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठाच्या 40 व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

**नौदलदिन-बीटींग रिट्रीट**

दरम्यान, नौदल दिनानिमित्त, काल, मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया इथे बीटींग रिट्रीट कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात नौदलाच्या बॅंड पथकाने शिस्तबद्ध संचलन करत विविध धून वाजवल्या. या सोहोळ्याला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**पंतप्रधान-कुवेत मंत्रीभेट**

आखाती सहकारी परिषद अर्थात जी सी सी चं अध्यक्षपद कुवेतकडे असेपर्यंत भारत आणि जी सी सी यांच्यातील सहकार्य अधिक दृढ होईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. कुवेतचे परराष्ट्र मंत्री अब्दुल्ला अली अल-याह्या यांनी काल पंतप्रधानांची दिल्लीतील त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या भेटीदरम्यान उभय नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, संस्कृती, परस्पर संबंध आणि सहकार्य अधिक वृद्धिंगत करण्याच्या उपायांवर चर्चा केली; तसंच पश्चिम आशियातील परिस्थितीवरही विचार विनिमय केला.

**महाराष्ट्र-शपथविधी**

भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस आज तिसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. मुंबईच्या ऐतिहासिक आझाद मैदानावर संध्याकाळी साडेपाच वाजता राज्यपाल सीपी राधाकृष्णन त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. फडणवीस यांची काल भाजप विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. फडणवीस, मित्रपक्ष, शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी काल राज्यपालांची भेट घेऊन, राज्यात नवीन सरकार स्थापन करण्याचा दावा केल्यानंतर राज्यपालांनी त्यांना सरकार स्थापनेसाठी निमंत्रण दिलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी, एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री शपथविधी सोहोळ्याला उपस्थित राहणार आहेत. राज्यपालांच्या भेटीनंतर

बातमीदारांशी बोलताना फडणवीस म्हणाले की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस व्यतिरिक्त, राष्ट्रीय समाज पक्ष, जनसुराज्य शक्ती पक्ष, युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा आणि इतर दोन अपक्ष आमदारांनी त्यांना पाठिंब्याची पत्रे दिली आहेत. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत भाजपच्या आतापर्यंतच्या सर्वोत्कृष्ट कामगिरीचं श्रेय फडणवीस यांना देण्यात आलं आहे. 54 वर्षीय फडणवीस यांनी यापूर्वी दोन वेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

**झारखंड-मंत्रिमंडळ**

झारखंड मध्ये विस्तारीत मंत्रीमंडळाच्या सदस्यांचा आज रांचीत शपथविधी होणार आहे. यावेळी राज्यपाल संतोषकुमार गंगवार 11 नवीन सदस्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील.

**लोकसभा**

लोकसभेत काल रेल्वे सुधारणा विधेयक 2024 सादर करण्यात आलं. या विधेयकामुळे रेल्वे क्षेत्रात कार्यक्षमता वाढीस लागेल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी विधेयकावर चर्चा करताना सांगितलं. गेल्या दहा वर्षांत 44 हजार किलोमीटरच्या रेल्वेमार्गाचं विद्युतीकरण झालं आहे, अशी माहिती वैष्णव यांनी दिली.

भारतनेट प्रकल्पाअंतर्गत देशभरातील 2 लाख 14 हजारांहून अधिक ग्रामपंचयतींना ब्रॉडबॅंड सेवा पुरवण्यात आली असल्याची माहिती दळणवळण राज्यमंत्री डॉक्टर पेमासानी चंद्रशेखर यांनी काल लोकसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना दिली.

**राज्यसभा**

ज्यसभेत काल, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनावर देण्यात येणाऱ्या किमान आधारभूत किंमतीच्या मुद्द्यावरून विरोधकांनी शून्य प्रहरात गदारोळ केला, त्यामुळे कामकाजात काही काळ व्यत्यय आला.

**इस्रो**

युरोपिय अंतरिक्ष संस्थेच्या प्रोबा-3 उपग्रहामध्ये काल उद्भवलेल्या तांत्रिक त्रुटीमुळं हा उपग्रह आज दुपारी 4 वाजून 12 मिनिटांनी इस्रोद्वारे अंतरिक्षात पाठविण्यात येणार आहे. श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतरिक्ष केंद्रातून PSLVC-59 या अग्नीबाणाद्वारे काल दुपारी हा उपग्रह सोडण्याचं नियोजित होतं. जगातील अशा प्रकारचा हा पहिला प्रयोग असून प्रोबा-3 मध्ये दोन उपग्रह आहेत, दोन अंतरिक्ष यानं एकत्रितपणे त्यांना अंतरिक्षात नेतील. एक मिलिमीटरच्या अचूकतेपर्यंत हे उपग्रह सूर्याच्या बाह्य वातावरणाचा अभ्यास करणार आहेत. इस्रोची वाणिज्य कंपनी असलेल्या न्यू स्पेस इंडिया लिमिटेडला युरोपिय संस्थेकडून हे कंत्राट मिळालं असून एका विशिष्ट रचनेमध्ये अचूकतेनं उड्डाण करण्याचा या मोहीमेचा लक्षणीय उद्देश आहे.

**फ्रान्स-अविश्वास**

फ्रान्समध्ये पंतप्रधान मिशेल बार्निए यांच्या सरकारनं नॅशनल असेंब्लीत काल विश्वासमत गमावलं त्यामुळं केवळ तीन महिन्यातंच या सरकारला पायउतार व्हावं लागलं. संसदेत मतदानाविना वार्षिक अंदाजपत्रक मंजुर करण्याचा प्रयत्न केल्यानंतर असेंब्लीच्या 577 पैकी 331 सदस्यांनी सरकारच्या विरोधात मत दिलं. या अंदाजपत्रकात फ्रान्सची सुरक्षितता आणि गुन्ह्यांविषयी वाढती चिंता व्यक्त करत, यावर कोणतेही उपाय सुचवले नसल्याचा आरोप विरोधकांनी केला. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ आज राष्ट्राला संबोधित करतील. 1962 मध्ये जॉर्जेस पॉम्पीदो यांच्यानंतर प्रथमच फ्रान्समधील एखाद्या सरकारनं विश्वासमत गमावलं आहे. युरोपिय संघाच्या निवडणुकीत मॅक्राँ यांच्या पक्षाची मोठी हार झाल्यानंतर त्यांनी नॅशनल असेंब्ली विसर्जित केल्याच्या केवळ सहा महिन्यातच फ्रान्समध्ये राजकीय आणि आर्थिक अस्थिरता पसरली आहे.

**भुतान नरेश भारत दौरा**

भुतान नरेश जिगमे खेसर नामग्येल वांगचूक आजपासून सपत्नीक दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान ते पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांच्यासाहित उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची भेट हेणार आहेत. उभय देशांदरम्यानचे विद्यमान संबंध अधिक दृढ करणे आणि द्वीपक्षीय सहकार्याचे नवीन मार्ग शोधणे हा या बैठकीचा उद्देश असल्याचं जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हंटलं आहे.

**RBI-UPI**

रिझर्व्ह बँकेने UPI लाइटची मर्यादा पाचशे रुपयांवरून एक हजार रुपयांपर्यंत वाढवली असून, कोणत्याही वेळेस एकंदर मर्यादा पाच हजार असल्याचं काल जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत म्हंटलं आहे. या नवीन मर्यादा तत्काल प्रभावाने लागू करण्यात आल्या आहेत. यापूर्वी, युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस-अर्थात UPI Lite द्वारे ऑफलाइन डिजिटल पेमेंट व्यवहारांची मर्यादा पाचशे रुपये तर वॉलेट मर्यादा दोन हजार रुपये ठेवण्यात आली होती. UPI चा अधिक व्यापक प्रमाणावर अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी या मर्यादा वाढवण्यात आल्या आहेत.

**आसाम-गोमांसबंदी**

आसाम सरकारने राज्यभरातील सर्व उपहारगृहं, हॉटेल्स, तसंच सार्वजनिक कार्यक्रम आणि इतर सामुदायिक ठिकाणी गोमांस पुरवण्यावर आणि खाण्यावर पूर्णतः बंदी जारी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी काल ही घोषणा केली. राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत गोमांस सेवनावरील विद्यमान कायद्यांमध्ये सुधारणांना मंजुरी देण्यात आली. या आधी, केवळ मंदिरांजवळ गोमांस सेवनावर बंदी घालण्यात आली होती, मात्र हा निर्णय आता संपूर्ण राज्यात लागू करण्यात आला आहे.

**हॉकी**

पुरुषांच्या हॉकी कनिष्ठ आशिया करंडक स्पर्धेच्या अंतिमफेरीत काल भारतानं पाकिस्तानचा 5-3 गोलनं पराभव करुन पाचव्यांदा अजिंक्यपद मिळवलं. अरईजित सिंग हुंडालनं भारतासाठी चार गोल गेले. हॉकीमध्ये भारत आशियात अजेय आहे हे भारतीय संघानं सिद्ध करताना प्रभुत्व, कौशल्य आणि काठीण्य दाखवलं असं हॉकी इंडियानं म्हटलं आहे. कनिष्ठ आशिया करंडकस्पर्धा पुढील वर्षी भारतात होणाऱ्या पुरुषांच्या एफ आय एच हॉकी कनिष्ठ विश्वचषकस्पर्धेसाठी पात्रता स्पर्धा आहे.

**हवामान**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने आज कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशची किनारपट्टी, यानम आणि रायलसीमा या भागात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तर, लक्षद्वीप लगतच्या आग्नेय अरबी समुद्राचा उत्तरेकडील भाग आणि नैऋत्य अरबी समुद्रावर आज वादळी हवामानाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, या भागात मच्छीमारांनी जाण्याचं टाळावं असा सल्ला हवामान खात्याने दिला आहे. दरम्यान, पुढील 3 दिवसांत देशाच्या वायव्य भागातील किमान तापमानात 3 ते 4 अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.